-: प्रेसनोट दिनांक - १७/१०/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक १) सुयोग दिनकर पाटणकर, वय - ४७ वर्षे, पद - अतिरिक्त कार्यकारी अभियंता, (वर्ग ०१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या, 'अ' उपविभागीय कार्यालय, इचलकरंजी, रा.खासबाग मैदान जवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर मुळ रा.सोमवार पेठ, पन्हाळा, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर, २) रविंद्र बापुसो बिरनाळे, वय- ३८ वर्षे, सहायक लेखापाल,(वर्ग ०३)महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या, 'अ' उपविभागीय कार्यालय, इचलकरंजी रा. अमराई रोड, शिक्षक कॉलनी, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तकारदार यांचे मालकीचे इमारतीमध्ये त्यांचे व्यवसायासाठी औदयोगिक परवाना लाईट जोडणी करून घेतली होती. सदर व्यवसाय बंद झालेनंतर तकादार यांनी सदरची जागा औदयोगिक परवाना लाईटसह कराराने भाडयाने दिली होती. संप्टेंबर २०२३ मध्ये तकारदार यांचे औदयोगिक परवाना लाईट मीटरची पाहणी महावितरणचे अधिकारी यांनी केली होती. त्यानंतर तकारदार यांना महावितरण 'अ' उपविभागीय कार्यालय, इचलकरंजी कार्यालयाकडुन अनाधिकृत वीज वापरली म्हणुन कलम १२६ प्रमाणे पाच वर्षाचा १,२२,६७८/- रूपये दंड झालेबाबतची नोटीस दिली होती. त्यावर तकारदार यांची सदर कार्यालयात सुनावणी झालेनंतर सदर कार्यालयातील आलोसे क्र. ०१ पाटणकर व ०२ बिरनाळे यांनी तक्रारदार यांना झालेला दंड पाच वर्षाचा दंड कमी करून फक्त एक वर्षाचा अंदाजे १९,०००/- रूपये असा केला आहे असे सांगुन तक्रारदार यांचेकडे दंडाचे १९,०००/- रूपये व दोघांसाठी ४१,०००/- रूपये असे एकुण ६०,०००/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन तकारदार यांचेकडे लाच मागणी केली.

तकारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आलोसे क्र. ०१ व ०२ यांनी तक्रारदार यांना तुम्हांला झालेला पाच वर्षाचा दंड कमी करून फक्त एक वर्षाचा अंदाजे १९,०००/- रूपये असा केला आहे असे सांगुन तक्रारदार यांच्याकडे दंडाचे अदांजे १९,०००/- रूपये व दोघांसाठी ४१,०००/- रूपये असे एकुण ६०,०००/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे दंडाचे अंदाजे १९,०००/- रूपयासह ५५,०००/- रूपये लाच मागणी करून सदरची लाच रक्कम आलोसे क्र.०१ पाटणकर यांनी आलोसे क्र. ०२ बिरनाळे यांचेकडे देणेस सांगितले.

त्यानंतर लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक **रविंद्र बापुसो बिरनाळे, वय- ३८ वर्षे, सहायक लेखापाल(वर्ग ०३) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या, 'अ' उपविभागीय कार्यालय, इचलकरंजी** यांनी तकारदार यांचेकडुन ५५,०००/- रूपये स्विकारून त्यातील १९,०६०/- रूपये दंडाचे भरून राहीलेले ३६,०००/- रूपये लाच रक्कम स्वत:साठी व आलोसे क्र.०१ पाटणकर यांचेसाठी स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन सदर **आरोपी अ.न. ०१ व ०२** यांचेविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, श्री संजिव बंबरगेकर, श्रेणी पोलीस उप निरीक्षक, पो.हे.कॉ. श्री विकास माने, पो.कॉ. श्री मयुर देसाई, पो.कॉ.श्री रूपेश माने,चा.पो.हे. कॉ. विष्णु गुरव ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.
५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.